आजचे पंचांग

२५ जून २०२६, गुरूवार
वार: गुरुवार तिथी: एकादशी (रात्री ०८:०९ पर्यंत) नक्षत्र: स्वाती (सायंकाळी ०४:२८ पर्यंत) चंद्र राशी: तूळसूर्य राशी: मिथुन शुभ आणि अशुभ वेळा: राहु काळ: दुपारी ०२:२० ते ०३:५९ पर्यंत (या काळात शुभ कामे टाळावीत) अभिजित मुहूर्त: दुपारी १२:१५ ते ०१:०८ पर्यंत

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरूवार, दि. २५ जून २०२६ वर्ष - १ अंक - २७० पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


### नवले पुलाखाली २२ लाखांचा गुटखा जप्त

**पुणे :** नवले पुलाखाली प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा उघडकीस आला असून पोलिसांनी केलेल्या कारवाईत २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये हबास मुबारक खान (वय ३४, रा. बाडमेर, राजस्थान) आणि सोहेल अस्लम मुलाणी (वय २२, रा. महात्मा फुले पेठ, पुणे) यांचा समावेश आहे. पोलिस अंमलदार देवा रमेश चव्हाण यांनी याबाबत फिर्याद दिली असून नवले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## भारतीय शिक्षणव्यवस्थेची स्थिती आणि परवडणाऱ्या शिक्षणाचा प्रश्न पुन्हा चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील शिक्षणव्यवस्थेतील असमानता आणि वाढत्या शिक्षणखर्चाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या फी संरचनेवरून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निरीक्षणानंतर, भारतातील उच्च शिक्षणाच्या परवडण्याजोगेपणावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

न्यायालयाने नुकतेच स्पष्ट केले की खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना सरकारी महाविद्यालयांइतकी कमी फी ठेवण्यास सक्ती करता येणार नाही. सरकारी संस्थांना राज्याकडून आर्थिक मदत मिळते, तर खासगी संस्था प्रामुख्याने विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या शुल्कावर अवलंबून असतात, असे न्यायालयाने नमूद केले. राजस्थानमधील काही खासगी मेडिकल कॉलेजांमध्ये वार्षिक फी सुमारे १८.९ लाख ते २५ लाख रुपयांपर्यंत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल करण्यात आली होती.

या निर्णयामुळे देशातील वैद्यकीय शिक्षणाची वाढती किंमत आणि त्याचा मध्यमवर्गीय तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम पुन्हा अधोरेखित झाला आहे. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला होता की आरक्षणाचा लाभ मिळाल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांना प्रचंड फीमुळे वैद्यकीय शिक्षण घेणे कठीण जाते. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी ही स्थिती अधिक आव्हानात्मक ठरत असल्याचेही त्यांनी म्हटले होते.



तज्ज्ञांच्या मते, भारतातील शिक्षणव्यवस्था दोन टोकांमध्ये विभागली गेली आहेएकीकडे सरकारी अनुदानित तुलनेने स्वस्त शिक्षण आणि दुसरीकडे खासगी संस्थांमधील उच्च शुल्क. अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि वैद्यकीय शिक्षण या क्षेत्रांमध्ये खासगीकरण वाढल्यामुळे गुणवत्तेचा आणि खर्चाचा समतोल राखणे मोठे आव्हान बनले आहे.

शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे आहे की केवळ प्रवेश वाढवणे पुरेसे नाही, तर आर्थिक सुलभता सुनिश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्जावरील सवलती आणि राज्यस्तरीय नियमन यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. तसेच खासगी महाविद्यालयांच्या फी संरचनेवर अधिक पारदर्शकता आणण्याची गरजही अधोरेखित केली जात आहे. दरम्यान, सरकारकडून शिक्षण क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी विविध योजना राबवल्या जात असल्या तरी, उच्च शिक्षणाच्या वाढत्या खर्चामुळे सामान्य कुटुंबांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम अद्यापही दूरचे स्वप्न ठरत असल्याचे चित्र आहे. वैद्यकीय शिक्षणासारख्या क्षेत्रात तर ही दरी अधिक स्पष्टपणे दिसून येते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणामुळे भविष्यात शिक्षणाच्या परवडण्याजोगेपणाबाबत धोरणात्मक चर्चा अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## पुढील पाच वर्षांत बालविवाहाचे प्रमाण १० टक्क्याखाली आणणार : राज्य सरकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य सरकारने पुढील पाच वर्षांत ते १० टक्क्यांखाली आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. ही माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली.

राज्याच्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) आकडेवारीनुसार, २०१९-२१ या कालावधीत देशातील बालविवाहाचे प्रमाण २३.३ टक्के होते, तर महाराष्ट्रात ते २१.९ टक्के नोंदविण्यात आले. २०२३-२४ मधील निवडक जिल्ह्यांच्या सर्वेक्षणानुसार देशाची सरासरी २०.१ टक्क्यांवर आली असून महाराष्ट्रात बालविवाहाचे प्रमाण १९.७ टक्क्यांपर्यंत घटले आहे.

बालविवाह प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या कारवाईत सातत्याने वाढ झाल्याचे सरकारच्या आकडेवारीत दिसून येते. चालू वर्षात आतापर्यंत १,४३४ बालविवाह रोखण्यात आले असून संबंधित दोषींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



**राज्यात बालविवाह रोखले बालविवाह रोखण्यात आले**

* २०१८-१९ : १८७
* २०१९-२० : २४०
* २०२०-२१ : ५१९
* २०२१-२२ : ८३१
* २०२२-२३ : ९३०
* २०२३-२४ : १,२५३
* २०२४-२५ : १,४९५

२०२२-२३ मध्ये बालविवाह प्रकरणांमध्ये ८१ एफआयआर नोंदविण्यात आल्याची माहितीही सभागृहात देण्यात आली. राज्यात बालविवाह प्रतिबंधासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हा कृती दल, ग्राम संरक्षण कक्ष तसेच तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणा कार्यरत आहेत. बालविवाहात सहभागी कुटुंबीय, संबंधित व्यक्ती आणि सहकार्य करणाऱ्यांविरुद्धही कारवाई केली जात असल्याचे मंत्री तटकरे यांनी स्पष्ट केले.

## बिरला यांच्या भूमिकेकडे लक्ष; बंडखोर खासदारांच्या अपात्रतेवर निर्णय निर्णायक ठरणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील सहा खासदारांच्या पक्षांतरानंतर निर्माण झालेल्या राजकीय पेचप्रसंगात आता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या खासदारांवर पक्षांतरबंदी कायद्यानुसार अपात्रतेची कारवाई करावी, अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली असून, स्पीकर न्याय देतील असा विश्वासही व्यक्त केला जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटाच्या प्रतिनिधींनी लोकसभा अध्यक्षांना भेटून या प्रकरणात तातडीने दखल घेण्याची विनंती केली आहे. या खासदारांनी पक्षाचा व्हिप आणि संघटनात्मक भूमिका डावलून शिंदे गटाशी जवळीक साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे दहाव्या अनुसूचीतील (अपींळ-ᶒशषशलींळेप डु) तरतुदींनुसार त्यांना अपात्र ठरवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

दुसरीकडे, शिंदे गटाचे म्हणणे आहे की, दोन-तृतीयांश खासदारांनी एकत्र येऊन स्वतंत्र गट तयार केल्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याचा भंग होत नाही. त्यामुळे अपात्रतेचा प्रश्न उद्भवत नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. या भूमिकेमुळे आता वाद अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे.

कायदेशीर तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय हा लोकसभा अध्यक्षांच्या विवेकाधीन अधिकारात येतो. अध्यक्षांनी पक्षांची अधिकृत मान्यता, व्हिपची वैधता आणि गटबदलाचे स्वरूप याचा सखोल अभ्यास करून निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे बिर्ला यांचा निर्णय केवळ या प्रकरणासाठीच नव्हे तर भविष्यातील पक्षांतर प्रकरणांसाठीही महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, संसदेत यापूर्वीही अनेक पक्षांतर प्रकरणांमध्ये अध्यक्षांच्या निर्णयावरून वाद निर्माण झाले आहेत. काही प्रकरणांमध्ये निर्णय तातडीने लागले, तर काही प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहिली आहेत. त्यामुळे या प्रकरणातही किती वेळ लागतो आणि अध्यक्ष कोणती भूमिका घेतात, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू आहेत.



सध्याच्या घडामोडींमुळे महाराष्ट्रातील तसेच देशातील राजकीय वातावरण तापले असून, पुढील काही दिवसांत लोकसभा अध्यक्षांचा निर्णय अत्यंत निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## दिशा सालियन मृत्यू प्रकरण : मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची सुनावणीतून माघार

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**मुंबई :** सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाशी संबंधित एका महत्त्वाच्या याचिकेच्या सुनावणीतून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांनी बुधवारी स्वतःला बाजूला **(Recuse)** केले आहे. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी ही याचिका दाखल केली असून, त्यांच्या मुलीची हत्या झाली असल्याचा आरोप करत या प्रकरणी गुन्हा **(FIR)** नोंदवण्याची मागणी त्यांनी केली आहे.प्रकरणाचे मुख्य मुद्देयाचिकाकर्त्यांची मागणी: सतीश सालियन यांनी पोलिसांच्या आत्महत्येच्या निष्कर्षाला न्यायालयात आव्हान दिले आहे. दिशाने आत्महत्या केली नसून तिची हत्या झाली आहे, असा दावा करत या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या **(IPC)** योग्य कलमांखाली एफआयआर नोंदवण्याची मागणी त्यांनी केली आहे. न्यायमूर्ती चव्हाण यांनी खुल्या न्यायालयात कोणतेही विशिष्ट कारण न देता या प्रकरणाच्या सुनावणीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. हे प्रकरण आता मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे वर्ग केले जाईल, जे या याचिकेची सुनावणी करण्यासाठी दुसऱ्या खंडपीठाची **(Bench)** नियुक्ती करतील.

## हॉटेल्समध्ये मोफत पिण्याचे पाणी बंधनकारक; तुकाराम मुंढेंचा कडक आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे आणि अन्न प्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांनी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी मोफत उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याचे अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच यासंदर्भात स्पष्ट सूचना फलक (बोर्ड) लावणे आवश्यक असून नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मुंढे यांनी सांगितले की, राज्यात सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेल्सनी केवळ अन्नच नव्हे तर स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मोफत देणे ही जबाबदारी आहे. ग्राहकांना बाटलीबंद पाणी घेण्यास भाग पाडले जाऊ नये, मात्र ग्राहकाने स्वतः मागणी केल्यास ते दिले जाऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. एफडीएच्या नियमांनुसार सर्व हॉटेल्सनी अन्न सुरक्षा मानके कायदा २०११ अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक असून स्वच्छता, अन्न तयार करण्याची प्रक्रिया आणि साठवणूक याबाबत काटेकोर नियम पाळणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुंढे यांनी अन्न सुरक्षिततेबाबतही गंभीर निरीक्षण नोंदवले. राज्यातील



विविध तपासण्यांमध्ये अस्वच्छ स्वयंपाकघर, वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर, निकृष्ट पॅकेजिंग आणि आरोग्यास अपायकारक परिस्थितीत अन्न तयार केले जात असल्याचे आढळून आले आहे. अशा प्रकारच्या त्रुटी सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, त्यांच्या कठोर कार्यपद्धतीमुळे एफडीए विभाग पुन्हा चर्चेत आला आहे. काही राजकीय नेत्यांनीही या विभागाच्या कामकाजावर आणि अन्न भेसळीच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे, नागरिकांच्या आरोग्यासाठी कडक नियम आवश्यक असल्याचे समर्थनही व्यक्त केले जात आहे. मुंढे यांनी किचनमधील स्वच्छतेवरही विशेष भर दिला आहे. हॉटेल्समध्ये झुरळ, पाल यांसारखे कीटक आढळल्यास तसेच व्हेज आणि नॉन-व्हेज अन्नाची योग्य विभागणी न केल्यास कडक कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे हॉटेल व्यवसाय क्षेत्रात मोठा परिणाम होण्याची शक्यता असून, ग्राहकांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## शेतकरी कर्जमाफीवरून विधानसभेत गदारोळ; अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून तीव्र संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानसभेत शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्री तसेच सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून सभागृहात मोठा गदारोळ निर्माण झाला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आमदारांनी एकत्रितपणे नाराजी व्यक्त करत तब्बल २० मिनिटांहून अधिक काळ कामकाज रोखून धरले.

सभागृहात कृषी व सहकार विभागाचे अधिकारी उपस्थित नसल्याने आमदारांनी तीव्र आक्षेप घेतला. अध्यक्षांकडून स्पष्ट सूचना देऊनही अधिकारी सभागृहात हजर न झाल्याने या मुद्द्यावर लेखी खुलासा मागवण्यात येईल, तसेच समाधानकारक उत्तर न मिळाल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा तालिका अध्यक्ष समाधान अवताडे यांनी दिला.

गोंधळ वाढल्यानंतर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे तातडीने सभागृहात दाखल झाले. मात्र, तोपर्यंत विरोधक आणि काही सत्ताधारी आमदारांनी अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून सरकारला धारेवर धरले होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना प्रशासनाची अनुपस्थिती ही दुर्लक्षाची बाब असल्याचा आरोप करण्यात आला.

भाजप आमदार हरिष पिंपळे यांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करण्याची मागणी करत सरकारवर टीका केली. पावसाअभावी पेरण्या ठप्प झाल्या असून जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे, मात्र सरकारकडून गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. याच मुद्द्यावर संजय कुटे यांनीही आक्रमक भूमिका घेतली.

विरोधी पक्षातील सदस्यांसह काही सत्ताधारी आमदारांनीही सभागृहात गोंधळ घालत प्रशासनाच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सहकार सचिवांना ४५ मिनिटांपूर्वीच सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते, तरीही ते न आल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.

भाजप नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही या प्रकारावर तीव्र प्रतिक्रिया दिली. अधिकारी वेळेत उपस्थित राहत नसतील तर ही केवळ अध्यक्षांची नाही, तर संपूर्ण विधिमंडळाच्या अधिकारांची अवहेलना असल्याचे ते म्हणाले. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.

या घटनेमुळे विधानसभेचे कामकाज काही काळ ठप्प झाले असून शेतकरी प्रश्नांवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.


## अण्णा हजारे यांचे उपोषण, घडलेले राजकीय बदल त्याच प्रकारचा परिणाम पुन्हा होईल का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अण्णा हजारे यांचे उपोषण आणि त्यातून २०११-२०१४ दरम्यान घडलेले राजकीय बदल हा भारतातील अलीकडच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. मात्र २०२६ मधील सध्याच्या परिस्थितीत त्याच प्रकारचा परिणाम पुन्हा होईल का, हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे.

२०११ मध्ये अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारविरोधी लोकपाल कायद्याच्या मागणीसाठी केलेल्या उपोषणाला देशभर प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. दिल्लीतील जंतर-मंतर आणि रामलीला मैदानावर झालेल्या आंदोलनामुळे मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभे राहिले. त्या वेळी सोशल मीडिया तुलनेने नवीन होता, तरीही माध्यमांमधून आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला. या आंदोलनातून पुढे इंडिया अगेन्स्ट करप्शन चळवळीला बळ मिळाले आणि राजकीय पातळीवर नवीन पक्षाचा उदय झाला. त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये मतदारांनी भ्रष्टाचार, पारदर्शकता आणि व्यवस्थेतील बदल या मुद्द्यांना महत्त्व दिले, ज्याचा परिणाम म्हणून २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत सत्तांतर घडले.

मात्र २०२६ मधील परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. आजचा राजकीय आणि सामाजिक संदर्भ अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. सोशल मीडिया अधिक प्रभावी आहे, परंतु त्याच वेळी माहितीचा प्रवाह विभागलेला आणि मतदार अधिक ध्रुवीकृत (श्रिरअॅळीशव) झालेला दिसतो. त्यामुळे एखाद्या एका आंदोलनाचा राष्ट्रीय पातळीवर तितकाच एकसंध परिणाम होईल, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. अण्णा हजारे यांचे नैतिक वजन आणि जनआंदोलन उभे करण्याची क्षमता आजही मान्य केली जाते. माहिती अधिकार कायद्यातील बदलांविरोधात त्यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा दिल्यास त्याला माध्यमांमध्ये नक्कीच मोठे कव्हरेज मिळेल. ग्रामीण भागात आणि पारदर्शक प्रशासनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये त्यांना अजूनही पाठिंबा मिळू शकतो. मात्र राष्ट्रीय निवडणुकीच्या निकालांवर थेट आणि निर्णायक परिणाम घडवण्याइतकी परिस्थिती आज तितकी सरळ राहिलेली नाही. आज मतदारांचा कल केवळ एका मुद्द्यावर आधारित राहत नाही. विकास, रोजगार, कल्याणकारी योजना, स्थानिक नेतृत्व आणि पक्षीय संघटनशक्ती यांचा एकत्रित परिणाम अधिक निर्णायक ठरतो. त्यामुळे एखादे आंदोलन सरकारवर दबाव निर्माण करू शकते, धोरणांमध्ये बदल घडवू शकते, पण २०११-२०१४ प्रमाणे संपूर्ण राजकीय सत्तांतर घडवेलच असे सांगता येत नाही. तरीही, अण्णा हजारे यांचे उपोषण प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाचे ठरू शकते. ते शासनावर नैतिक दबाव निर्माण करू शकते आणि माहिती अधिकारासारख्या विषयांवर पुनर्विचार करण्यास भाग पाडू शकते. सरकारला जनभावना लक्षात घेऊन काही सुधारणा करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात, अण्णा हजारे यांचे आंदोलन आजही प्रभावी ठरू शकते, परंतु २०१४ सारखा थेट राजकीय बदल घडवण्याची शक्यता तुलनेने कमी आहे. त्याचा परिणाम अधिक धोरणात्मक आणि मर्यादित स्वरूपाचा असण्याची शक्यता अधिक आहे.



## संपादकीय

### बदलती जीवनशैली, 'एआय'चे आक्रमण आणि लग्नसंस्थेचे भवितव्य

आजच्या वेगवान डिजिटल युगात मानवी नातेसंबंधांचे ताणेबाणे वेगाने बदलत आहेत. पूर्वी विवाहाकडे 'जन्माचा संबोध' आणि एक पवित्र, न तुटणारा संस्कार म्हणून पाहिले जात होते. मात्र, आज २१ व्या शतकात ही विवाह संस्था एका अत्यंत गंभीर आणि नाजूक वळणावर येऊन ठेपली आहे. प्रख्यात लेखक आणि विचारवंत संदीप दास यांनी वर्तवलेले भाकीत आजच्या सामाजिक वास्तवावर थेट बोट ठेवते. त्यांच्या मते, २०४० पर्यंत पारंपारिक लग्नसंस्था पूर्णपणे कोलमडण्याच्या मार्गावर असेल. हा केवळ एक अंदाज नसून बदलत्या मानसिकतेचा आणि विज्ञानाचा आपल्या खाजगी आयुष्यावरील वाढत्या प्रभावाचा तो एक इशारा आहे.बदलत्या काळाची कठोर आकडेवारी **(Facts)** कोणत्याही सामाजिक बदलाचा अभ्यास करताना भावनांपेक्षा वस्तुस्थितीकडे पाहणे अधिक गरजेचे असते. जागतिक स्तरावरील नामांकित वित्तीय संस्था 'मॉर्गन स्टेनली'च्या एका महत्त्वपूर्ण अहवालानुसार, २०३० पर्यंत जगातील सुमारे ४५% महिला अविवाहित राहण्याची दाट शक्यता आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की, आता लग्न करणे हा महिलांसाठी एकमेव किंवा अनिवार्य पर्याय राहिलेला नाही. दुसरी महत्त्वाची आणि विचार करायला लावणारी आकडेवारी म्हणजे, आज जगभरात होणाऱ्या एकूण घटस्फोटांपैकी तब्बल ७०% पेक्षा जास्त घटस्फोट हे महिलांकडून पुढाकार घेऊन घेतले जात आहेत. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि करिअरच्या संधींमुळे स्त्रिया आता भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहिलेल्या नाहीत. पूर्वीच्या काळी केवळ समाजाच्या भीतीपोटी किंवा आर्थिक परावलंबित्वामुळे स्त्रिया छळ आणि तडजोड सहन करूनही संसारात टिकून राहत असत. परंतु, आजचा आधुनिक समाज आणि स्त्री ही तडजोड करायला तयार नाही. सन्मान आणि आदर नसेल, तर नात्यातून सन्मानाने बाहेर पडणे तरुण पिढीला अधिक योग्य वाटते. मेट्रो शहरांमधील जवळपास ४०% तरुण **(Gen Z)** तर लग्नाला आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा मानण्यासच तयार नाहीत.पौराणिक दाखले: नात्याचा पाया 'आदर आणि विश्वास'भारतीय संस्कृतीमध्ये लग्नाला केवळ दोन व्यक्तींमधील करार मानले गेले नाही. आपल्या पौराणिक ग्रंथांमध्ये अशा अनेक कथा आहेत, ज्या आजच्या या स्वार्थी आणि क्षणभंगुर नात्यांच्या युगात मार्गदर्शक ठरू शकतात. प्रभू रामचंद्र आणि माता सीता **(परस्पर आदर):** रामायणातील राम आणि सीतेचे नाते हे एकमेकांच्या हक्कांपेक्षा एकमेकांच्या आदरावर आधारित होते. श्रीरामांनी जेव्हा वनवासाचा निर्णय घेतला, तेव्हा सीतेने राजवैभवाचा त्याग करून पतीसोबत जाणे पसंत केले. हा निर्णय कोणत्याही कौटुंबिक दबावापोटी नव्हता, तर तो केवळ पतीबद्दलच्या आदर आणि प्रेमापोटी होता. आजच्या नात्यांमध्ये नेमका याच परस्पर आदराचा **(Mutual Respect)** अभाव आहे. अहंकाराच्या लढाईत नाती क्षणात मोडीत निघत आहेत.सत्यवान आणि सावित्री **(अतूट निष्ठा):** सावित्रीने आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि निष्ठेच्या जोरावर यमराजाशी संवाद साधून सत्यवानाचे प्राण परत मिळवले. ही कथा पती-पत्नीमधील आत्मिक जोडणीचे आणि संकटातही पाठीशी उभे राहण्याचे प्रतीक आहे. आज सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत छोट्या गैरसमजांमुळे एकमेकांवरचा विश्वास उडतो, तिथे सावित्रीची ही निष्ठा आजच्या पिढीला अंतर्मुख करणारी आहे.नल आणि दमयंती **(संकट काळातील सहजीवन):** राजा नल जेव्हा आपले सर्व वैभव जुगारात हरला आणि जंगलात भटकत होता, तेव्हा दमयंतीने त्याची साथ सोडली नाही. वाईट परिस्थितीत जोडीदाराचा हात घट्ट धरून ठेवणे हीच लग्नाची खरी कसोटी असते. आज आर्थिक चणचण किंवा मानसिक ताण आल्यास जोडपे लगेच विभक्त होण्याचा **(Divorce)** मार्ग निवडतात, जे या पौराणिक आदर्शांच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता **(AI)** आणि मानवी एकाकीपणाचा धोकासंदीप दास यांनी मांडलेला सर्वात धक्कादायक आणि विचार करायला लावणारा मुद्दा म्हणजे 'एआय'चा **(Artificial Intelligence)** मानवी नात्यांमधील हस्तक्षेप. त्यांच्या मते, २०४० पर्यंत माणसाच्या आयुष्यात दोन सोबती असू शकतातएक मानवी जोडीदार आणि दुसरा 'एआय रोबोट'.आजचा माणूस सोशल मीडियावर हजारो मित्रांशी जोडलेला असूनही वैयक्तिक आयुष्यात प्रचंड एकाकी आहे. कामगारांचे वाढते तास, मानसिक ताण आणि संवाद कमी झाल्यामुळे भविष्यात लोक मानवी नात्यांमधील गुंतागुंत आणि वाद टाळण्यासाठी 'एआय' रोबोट्सचा आधार घेतील. हे रोबोट्स कधीही वाद घालत नाहीत, ते तुमच्या मूडनुसार वागतात आणि नेहमी उपलब्ध असतात. महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला विचारले होते, ''मनुष्याचा खरा सोबती कोण?'' त्यावर युधिष्ठिराने उत्तर दिले होते, ''धैर्य हाच मनुष्याचा खरा सोबती.'' आजच्या युगात धैर्य आणि समजूतदारपणाची जागा यंत्रे घेत आहेत, ही मानवी संस्कृतीसाठी धोक्याची घंटा आहे. यंत्र कधीही मानवी भावनांची आणि प्रेमाची उब देऊ शकत नाही. **निष्कर्ष:** विवाह टिकवण्याचे त्रिसूत्रहार्वर्ड विद्यापीठाच्या एका जगप्रसिद्ध प्रदीर्घ संशोधनातून **(Harvard Study of Adult Development)** हे सिद्ध झाले आहे की, मानवी जीवनात दीर्घायुष्य आणि खऱ्या आनंदासाठी पैसा किंवा यश नाही, तर उत्तम नातेसंबंध सर्वात महत्त्वाचे असतात.लग्नसंस्था वाचवायची असेल, तर केवळ विवाह सोहळ्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करून चालणार नाही, तर नात्याच्या गुणवत्तेवर काम करावे लागेल. त्यासाठी मैत्री **(Friendship)**, आदर **(Respect)** आणि संवाद **(Communication)** हे तीन खांब मजबूत असणे गरजेचे आहे. जोपर्यंत पती-पत्नी एकमेकांचे चांगले मित्र बनत नाहीत आणि एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करत नाहीत, तोपर्यंत कोणतेही नाते टिकू शकत नाही. पौराणिक काळातील उदाहरणे आणि आजचे आधुनिक विज्ञान दोन्ही एकाच निष्कर्षावर येतातनाते हे हक्कांपेक्षा कर्तव्यावर आणि अवाजवी अपेक्षांपेक्षा समजूतदारपणावर टिकते.

# स्थायी समितीत चक्क ऐनवेळी ९ कोटींच्या प्रस्तावांना मंजुरी

## जलशुद्धीकरणासाठी रसायन खरेदी आणि भोसरी विद्युतदाहिनीच्या कोट्यवधींच्या प्रस्तावांना स्थायीचा हिरवा कंदील..

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बुधवारी झालेल्या सभेत सुमारे ९ कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या दोन महत्त्वाच्या विषयांना ऐनवेळी मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे हे दोन्ही विषय मूळ विषयपत्रिकेत नसताना सभेपुढे दाखल करण्यात आल्याने प्रशासनाच्या नियोजन आणि कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.



ते दोन विषय कोणते?

मंजूर करण्यात आलेल्या पहिल्या विषयानुसार सेक्टर २३, निगडी आणि चिखली टप्पा क्रमांक १ जलशुद्धीकरण केंद्रासाठी आवश्यक असलेल्या लिक्विड व पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड (झअउ) या रसायनांच्या खरेदीसाठी सुमारे ६ कोटी ३७ लाख रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. शहराला पुरवठा होणारे पाणी शुद्ध करण्यासाठी हे रसायन अत्यावश्यक मानले जाते. निविदा प्रक्रियेनंतर मे. एसव्हीएस केमिकल कॉर्पोरेशन एलएलपी आणि मे. गुजरात अल्कलीज अँड केमिकल्स लिमिटेड या दोन कंपन्यांकडून ६०:४० प्रमाणात पुरवठा करण्यात येणार आहे. दुसरा विषय भोसरी स्मशानभूमीतील विद्युतदाहिनी, प्रदूषित हवा नियंत्रण यंत्रणा आणि विविध विद्युत उपकरणांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीशी संबंधित होता. सध्या सुरू असलेल्या कराराची मुदत ३० जून रोजी संपुष्टात येत असल्याने नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सेवा खंडित होऊ नये यासाठी तीन महिन्यांच्या वाढीव कालावधीसह २ कोटी ६७ लाख रुपयांच्या सुधारित खर्चास मंजुरी देण्यात आली.

दोन्ही विषयांची एकत्रित किंमत सुमारे ९ कोटी ५ लाख रुपये इतकी आहे. मात्र या दोन्ही विषयांबाबत काही प्रश्न उपस्थित होत आहेत.

जलशुद्धीकरण रसायनांच्या खरेदीची निविदा प्रक्रिया जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात पूर्ण झाली होती. तसेच भोसरी स्मशानभूमीच्या देखभाल कराराची मुदत जूनअखेर संपणार असल्याची माहिती प्रशासनाला आधीपासूनच होती. असे असताना हे विषय नियमित विषयपत्रिकेत समाविष्ट करून वेळेत समितीसमोर का आणण्यात आले नाहीत, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

**स्थायी सदस्यांचा अपुरा अभ्यास?**

महापालिकेतील कोट्यवधी रुपयांचे आर्थिक विषय विषयपत्रिकेवर न आणता ऐनवेळी सादर केल्याने सदस्यांना प्रस्तावांचा सखोल अभ्यास, निविदा अटींची पडताळणी आणि आर्थिक परिणामांचा आढावा घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेषतः जलशुद्धीकरण रसायनांच्या खरेदीत निविदा मूळ अंदाजित रकमेपेक्षा ३.२५ टक्के जादा दराने स्वीकारण्यात आली आहे.

प्रशासनाच्या मते दोन्ही विषय अत्यावश्यक स्वरूपाचे असून विलंब झाल्यास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया आणि स्मशानभूमीतील सेवा विस्कळीत होऊ शकल्या असत्या. मात्र एवढ्या महत्त्वाच्या आणि कोट्यवधी रुपयांच्या प्रस्तावांना ऐनवेळी मंजुरी घेण्याची वेळ का आली, हा प्रश्न मात्र गुलदस्त्यात आहे.

### स्थायी समितीकडून मेट्रो, जलनिस्सारण, अग्निसुरक्षा व आरोग्य सुविधांसह विकासकामांना मंजुरी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत शहराच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मेट्रो विस्तार, जलनिस्सारण व्यवस्था, अग्निसुरक्षा, आरोग्य सुविधा, रस्ते विकास, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांसह अनेक प्रकल्पांना हिरवा कंदील देण्यात आला. बैठकीत पुणे मेट्रो फेज-१ विस्तारांतर्गत निगडी येथील अतिरिक्त चौथ्या मेट्रो स्थानकासाठी महापालिकेच्या आर्थिक सहभागास मान्यता देण्यात आली. तसेच दिघी, बोपखेल, दापोडी परिसरातील मलनिस्सारण व्यवस्थेच्या उन्नतीकरणासह मामुर्डी येथे नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामालाही मंजुरी देण्यात आली. पुनावळे येथील अग्निशमन केंद्राच्या बांधकामासाठी सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली असून शहरातील विविध प्रकल्पांमधील अग्निशामक यंत्रणांच्या देखभाल-दुरुस्तीची कामेही मंजूर करण्यात आली. याशिवाय वायसीएम रुग्णालयातील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या मान्यताप्रक्रियेसाठी आवश्यक शुल्क आणि सोनोग्राफी यंत्रणेच्या देखभालीस मंजुरी देण्यात आली.

महापालिका शाळांची दुरुस्ती, कोयनानगर व सीडीसी परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण, मुख्य प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती, सभागृह नूतनीकरण, पावसाळी वाहिन्यांची साफसफाई तसेच डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजनांनाही मान्यता देण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी गॅस डिटेक्टर खरेदीलाही मंजुरी देण्यात आली.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विकासकामांना प्राधान्य देत शहराला अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे, असे सभापती अभिषेक बारणे यांनी सांगितले.

# वाकडमध्ये पाणीबाणी

## दोन दिवसांपासून सोसायटीधारकांचे नळ कोरडे..

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी- चिंचवड महापालिकेने १५ टक्के पाणी कपातीचा निर्णय जाहीर केल्यानंतर वाकड परिसरातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. स्वामी विवेकानंदनगर, चौधरी पार्क, पारखे वस्ती, शनी मंदिर परिसर आणि आसपासच्या भागांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

> १५ टक्के पाणी कपातीमुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवतेय. पाण्याच्या दोन टाक्या आहेत. परंतु, त्या अपुऱ्या पाण्यामुळे भरता येत नाहीत. वरिष्ठ याबाबत आज बैठक घेऊन तोडगा काढतील.
>
> **– जय कानडे, कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा विभाग, ड प्रभाग**

स्थानिक सोसायटीधारकांनी सांगितले की, पाणी कपातीचा निर्णय लागू झाल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून नळांना पाणी येणे बंद झाले. त्यामुळे सोसायट्यांमधील पाणीसाठे संपले असून नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र टँकरचे वाढते दर आणि अपुरा पुरवठा यामुळे आर्थिक भुर्दंड वाढला आहे. अनेक वेळा मागणी करूनही टँकर उपलब्ध होत नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे.

नागरिकांनी पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या असता, वरूनच पुरेसे पाणी मिळत नाही, असे कारण अधिकाऱ्यांकडून दिले जात असल्याचा आरोप सोसायटीधारकांनी केला आहे. पावसाने अद्याप अपेक्षित हजेरी लावलेली नसल्याने जलसाठ्यांवर ताण निर्माण झाला असून त्याचा थेट फटका नागरिकांना बसत आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नावर सत्ताधारी भाजप पदाधिकारी आणि स्थानिक नगरसेवक मौन बाळगून असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. नगरसेवक आणि प्रशासनाने वेळेत नियोजन केले असते तर ही परिस्थिती टाळता आली असती, असा संतापही व्यक्त केला जात आहे. वाकड परिसरातील वाढत्या तक्रारींमुळे महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग आता नागरिकांच्या रडारवर आला असून तातडीने पर्यायी व्यवस्था करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही काही रहिवाशांनी दिला आहे. वाकड परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढल्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे.

# सुरक्षा रखवालदारांना थेट सुरक्षा निरीक्षकपदी पदोन्नती; पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विधी समितीचा महत्त्वपूर्ण ठराव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सुरक्षा रखवालदार कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नतीचा मार्ग अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने विधी समितीने महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला आहे. पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या सुरक्षा रखवालदारांना यापुढे सुरक्षा सुपरवायझरऐवजी थेट सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय समितीच्या विशेष बैठकीत घेण्यात आला. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सभेपुढे सादर करण्यात येणार आहे.



विधी समितीच्या सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीला समिती सदस्यांसह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सध्या अस्तित्वात असलेल्या पदोन्नती संरचनेनुसार, पात्र सुरक्षा रखवालदारांना प्रथम सुरक्षा सुपरवायझर पदावर पदोन्नती दिली जाते. त्यानंतर आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या सुरक्षा सुपरवायझरना सुरक्षा निरीक्षक पदावर बढती मिळते. मात्र, या प्रक्रियेत वेळ लागत असल्याने आणि प्रशासकीय स्तरावर पदांची पुनर्रचना करण्याच्या उद्देशाने विधी समितीने सुरक्षा सुपरवायझर आणि सुरक्षा निरीक्षक ही दोन पदे एकत्र करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. नव्या प्रस्तावानुसार, सुरक्षा सुपरवायझर हे मध्यवर्ती पद रद्द करून सुरक्षा निरीक्षक हे एकमेव पद कायम ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र सुरक्षा रखवालदारांना थेट सुरक्षा निरीक्षक पदावर बढती मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेला गती मिळेल तसेच प्रशासनातील कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बैठकीत केवळ पदोन्नतीचा मुद्दाच नव्हे तर शहरातील होर्डिंग्जच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा आढावा, महापालिकेच्या महसूलवाढीचे उपाय आणि महापालिकेच्या ताब्यातील उपलब्ध जागांचा प्रभावी वापर यासारख्या विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. दरम्यान, या निर्णयामुळे सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, महापालिका सभेची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भातील हा निर्णय महापालिकेच्या प्रशासनिक सुधारणांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

# चिखलीत 'आयजीएमएस' कस्टमर सर्विसच्या नावाखाली लाखो रुपयांची ऑनलाईन फसवणूक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चिखली :** ऑनलाईन विम्याच्या कागदपत्रांची पडताळणी करून पॉलिसीचे पैसे काढून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ८ लाख ७१ हजार २३५ रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक **(Cyber Fraud)** केल्याची घटना चिखली परिसरात उघडकीस आली आहे.




याप्रकरणी अज्ञात मोबाईल धारकावर चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**घटनेचे ठिकाण:** नवनिर्माण हौसिंग सोसायटी, रुपीनगर, चिखली, पुणे.

**फिर्यादी:** अच्युत ज्ञानदेव ससाणे (वय ४९ वर्ष, रा. चिखली, पुणे).

**दाखल गुन्हे:** भारतीय न्याय संहिता **(BNS)** २०२३ चे कलम ३१८(४), ३१६(२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम **(IT Act)** कलम ६६ डी अन्वये गुन्हा दाखल.

**सविस्तर वृत्त :** पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जानेवारी २०२५ ते १० मार्च २०२६ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला. अज्ञात आरोपीने त्याच्या मोबाईल नंबरवरून फिर्यादी अच्युत ससाणे यांच्या मोबाईलवर कॉल केला. आपण 'आय.जी.एम.एस. **(IGMS)** कस्टमर सर्विस' मधून बोलत असल्याचे सांगून आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. ''तुमच्या पॉलिसीचे कागदपत्रे पाठवा, ते बघून आम्ही पॉलिसीचे सर्व पैसे तुम्हाला काढून देतो,'' असे खोटे आमिष आरोपीने फिर्यादीला दाखवले. त्यानंतर वेगवेगळ्या कारणांसाठी ऑनलाईन पैसे भरण्यास भाग पाडून आरोपीने फिर्यादीकडून एकूण ८,७१,२३५/- रुपये उकळले. पैसे भरूनही पॉलिसीची रक्कम परत न मिळाल्याने आणि समोरून कोणताही प्रतिसाद न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. या प्रकरणी चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोउपनि फडतरे करत आहेत.

# मावळात कोट्यवधींच्या जमिनीसाठी थेट प्रांताधिकाऱ्यांचा बनावट आदेश! तळेगाव दाभाडेत हायप्रोफाइल फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव दाभाडे :** सरकारी अधिकार्यांच्या बनावट सह्या आणि खोट्या आदेशांचा वापर करून कोट्यवधी रुपयांची शासकीय व कौटुंबिक जमीन हडपण्याचा आणि ती विकून शासनाची फसवणूक केल्याचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार मावळ तालुक्यातील मौजे मोरेवे येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुंबई, कोल्हापूर आणि पुण्याच्या ६ बड्या व्यक्तींवर तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**घटनेचे ठिकाण :** दुय्यम निबंधक कार्यालय, तळेगाव दाभाडे व मौजे मोरेवे, ता. मावळ.

**आरोपींची नावे :** १) मनीष वसंत वाकडे (रा. वारजे, पुणे), २) विनोद भिमाजी डफळ (रा. वडगाव बुद्रुक, पुणे), ३) समिर सदानंद काढगे (रा. अंधेरी वेस्ट, मुंबई), ४) प्रियदर्शनी धोंडिसराम शिंदे (रा. बळवंतनगर, कोल्हापूर), ५) समिर शिवशंकर लोहकरे, ६) स्मिता शिवशंकर लोहकरे (दोघे रा. बोरिवली वेस्ट, मुंबई). (आरोपी अटक नाहीत)

**फिर्यादी :** सचिन छगनराव कोकाटे (वय ४५, रा. कोरेगाव पार्क, पुणे – व्यवसाय: नोकरी, मंडळ अधिकारी).

**दाखल गुन्हे :** भारतीय न्याय संहिता **(BNS)** कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४०, ३ (५), ३४० (२) अन्वये गुन्हा दाखल.

**सविस्तर वृत्त :** मिळालेल्या माहितीनुसार, मौजे मोरेवे येथील गट नं. ३६१ मधील ९ हेक्टर ५४ आर या सामायिक क्षेत्रातील जमिनीचे सातबारा उघडण्यासाठी आरोपी मनीष वाकडे आणि विनोद डफळ यांनी कट रचला. त्यांनी चक्क मा. उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी उपविभाग (प्रांताधिकारी) यांच्या कार्यालयाचा एक बनावट आदेश (क्र. एनए/एसआर/२५६/२०२२) तयार केला. या बनावट आदेशाच्या आधारे त्यांनी इतर आरोपींना ती जमीन बेकायदेशीरपणे विक्री केली. इतकेच नव्हे, तर खरेदी देणार आणि खरेदी घेणार अशा १ ते ६ आरोपींनी संगनमत करून, दुय्यम निबंधक कार्यालयात या बनावट आदेशाच्या आधारे दस्त नोंदणी करून शासनाची आणि कुटुंबाची मोठी आर्थिक फसवणूक केली. या हायप्रोफाइल प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि खामगळ करत आहेत.

# ऑनलाईन गेमिंग आणि सट्टेबाजीच्या जाहिरातीला बळी पडून ३० लाख ८३ हजार ८२१ रुपयांचा आर्थिक फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** सोशल मीडियावरील इन्स्टाग्राम आयडीवरून ऑनलाईन गेमिंग आणि सट्टेबाजीच्या **(Betting)** जाहिरातीला बळी पडून मोशी प्राधिकरणातील एका तरुणाला ३० लाख ८३,८२१ रुपयांचा प्रचंड आर्थिक फटका बसला आहे. पैसे दुप्पट करून देण्याच्या नादात या तरुणाची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे.




**घटनेचे ठिकाण:** केंद्रीय विहार, मोशी प्राधिकरण, पुणे.

**आरोपी:** इन्स्टाग्राम आयडी **"Four rabet"** चा धारक (अटक नाही).

**फिर्यादी :** प्रशांत सुरेश सपकाळ (वय ३३ वर्ष, रा. मोशी प्राधिकरण, मूळ गाव- कोठे बुद्रुक, संगमनेर).

**दाखल गुन्हे:** एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल.

फिर्यादी प्रशांत सपकाळ हे मोशी प्राधिकरणात राहत असताना, त्यांना इन्स्टाग्रामवर **'pankasapkan'** या आयडीवर **'Four rabet'** नावाच्या पेजवरून ऑनलाईन गेमिंग व बेटिंगची जाहिरात दिसली. आरोपीने प्रशांत यांना ऑनलाईन गेमिंगमध्ये पैसे लावल्यास रक्कम दुप्पट करून परत देण्याचे आमिष दाखवले.

या आमिषाला बळी पडून फिर्यादीने त्यांच्या कोटक महिंद्रा बँकेच्या खात्यातून आरोपीने दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर आणि क्यूआर कोड स्कॅनरवर वेळोवेळी पैसे पाठवले. प्रशांत यांनी एकूण ३०,८३,८२१ रुपये गुंतवले, मात्र परतावा म्हणून एकही रुपया मिळाला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पुढील तपास सपोनि खोसे करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात १८ वा बळी; श्रीमंत कोळी यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**फुगेवाडी (पुणे) :** येथील विषारी दारू प्रकरणात आणखी एकाचा बळी गेल्याने एकूण मृतांची संख्या आता १८ वर पोहोचली आहे. श्रीमंत कोळी यांची गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली मृत्यूशी झुंज अखेर रविवारी अपयशी ठरली.

विषारी दारूच्या प्राशनामुळे प्रकृती चिंताजनक बनल्याने त्यांना पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अतिदक्षता विभागात तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या प्रकृतीत मागील आठवड्यात काही प्रमाणात सुधारणा झाली होती. त्यामुळे डॉक्टरांसह त्यांच्या चिंतेत असलेल्या कुटुंबीयांच्या आशा वाढल्या होत्या, मात्र हा दिलासा तात्पुरता ठरला. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही अखेर रविवारी सायंकाळी पाच वाजता रुग्णालयाकडून कोळी यांच्या निधनाची अधिकृत घोषणा करण्यात आली. यासंदर्भात माहिती देताना वायसीएम रुग्णालयाचे वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. प्रवीण सोनी यांनी स्पष्ट केले की, विषारी दारूमुळे शरीरात अनेक अवयवांवर विपरित परिणाम होतो, ज्यामुळे रुग्णाच्या तब्येतीत चढ-उतार होतात. अशा परिस्थिती अनेकदा नियंत्रित वाटणारी रुग्णांची प्रकृती अचानक खालावू शकते. कोळी यांच्या बाबतीतही नेमके हेच घडले. कोळी यांच्या मृत्युमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कष्टाचे काम, मोलमजुरी करून कोळी उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या मागे पत्नी, मुले असा परिवार आहे.

### बनावट लग्नाचा पर्दाफाश..! १.६० लाखांची फसवणूक; 'लुटेरी दुल्हन'सह टोळी जाळ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव आनंद :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणांना लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश आळेफाटा पोलिसांनी केला आहे. लग्न झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत नवरी पळून जाण्याच्या तयारीत असताना हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी नवरीसह चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. अजय भीमराज रोहोम (रा. एकरुखे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) या तरुणाने तक्रार दिली आहे. त्यानुसार अमोल पिंजारी (श्रीरामपूर), संगीता शिंदे (आळे, जुन्नर), सोनाली भोसले (परतूर, जालना) आणि नवरी मुलगी राधा रमेश काळे (जालना) यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी अजयच्या लग्नासाठी मध्यस्थांमार्फत आळे येथील एजंट संगीता शिंदे यांच्याशी संपर्क झाला.

# बालगंधर्व रंगमंदिर हे सांस्कृतिक राजधानीचे वैभव ५८ व्या वर्धापन दिनी उल्हास पवार यांचे गौरवोद्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** बालगंधर्व रंगमंदिर हे सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराचे वैभव आहे. महाराष्ट्राचे लाडके हरहुन्नरी व्यक्तिमत्व असलेल्या पु. ल. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली उभारणी झालेल्या बालगंधर्व रंगमंदिर आता केवळ शहराच्या अथवा महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानाचे स्थान आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत, रसिकाग्रणी उल्हास पवार यांनी काढले.

बालगंधर्व परिवार ट्रस्ट आणि पुणे महापालिकेच्या वतीने अलविरा मोशन एंटरटेन्मेंट प्रस्तुत बालगंधर्व रंगमंदिराच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बालगंधर्व महोत्सवाचे अध्यक्षस्थानावरून उल्हास पवार बोलत होते.

यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, ज्येष्ठ गायक आनंद शिंदे, सूर्यदत्ता इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ संजय चोरडिया, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे,अभिनेते सुशांत शेलार,अभिनेत्री वर्षा उसगांवकर, अशोककुमार सराफ,बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले,अलविरा मोशन एंटरटेन्मेंटच्या दिपाली कांबळे,ॲड. मंदार जोशी, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




या कार्यक्रमात 'मेलडी मेकर्स'च्या माध्यमातून सिने संगीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे अशोककुमार सराफ यांना 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे पद्मश्री रघुवीर खेडेकर, जेष्ठ पत्रकार विद्याधर कुलकर्णी, सागर आव्हाड, विजय जगताप,राज देशमुख, गायिका सावनी दातार कुलकर्णी,अलविरा झरेकर, चित्रपट निर्माते दत्ता दळवी, मंगेश मोरे, डॉ. गौरव घोडे, लोककलावंत, लेखक व दंतचिकित्सक आशुतोष जावडेकर यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे अखिल भारतीय चित्रपट महामंडळ व अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचाही या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

बालगंधर्व रंगमंदिराच्या भूमिपूजन आणि उद्घाटन या दोन्ही ऐतिहासिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची संधी आपल्याला प्राप्त झाल्याची आठवण उल्हास पवार यांनी यावेळी सांगितली. शास्त्रीय संगीत, नाटक, लोककला अशा सर्व कलाप्रकारांना बालगंधर्व रंगमंदिराच्या माध्यमातून न्याय मिळाल्याचे उल्हास पवार यांनी नमूद केले. कोणत्याही कला प्रकारांमध्ये श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असे काही असत नाही. नाट्यसंगीत हा शास्त्रीय संगीत, लोकसंगीत, दादरा, ठुमरी या प्रकारांचा सुरेल संगम असल्याचे त्यांनी नमूद केले. ऋषितुल्य गायक पंडित भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, सुधीर फडके अशा कलाकारांच्या स्वर्गीय सादरीकरणाचा साक्षीदार बालगंधर्व रंगमंदिर असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्याला मिळालेल्या जीवनगौरव पुरस्कार हा आपल्या एकट्याचा नसून आपल्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान असल्याचे अशोककुमार सराफ यांनी कृतज्ञतेने नमूद केले. मेलडी मेकर्सने देशाच्या सर्व राज्यात आणि जगातील बहुतेक महत्त्वाच्या देशांमध्ये सादरीकरण केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या शेकडो कलाकारांच्या प्रयत्नांनीच हे शिखर गाठणे शक्य झाल्याचे ते म्हणाले. बालगंधर्व रंगमंदिर आणि मेलडी मेकर्स यांचे जिव्हाळ्याचे संबंध असून बालगंधर्व रंगमंदिरातील कार्यक्रमाचे पहिले बुकिंग मेलडी मेकर्सचे असल्याचे सराफ यांनी अभिमानाने नमूद केले. सुरुवातीच्या काळात बालगंधर्व रंगमंदिरात साऊंड सिस्टिम नसल्याने तब्बल एक महिना मेलडी मेकर्सची साऊंड सिस्टिम रंगमंदिरात वापरण्यात आल्याची आठवणही त्यांनी कथन केली. शाळकरी मित्रांच्या कला प्रेमामुळे एकत्र आलेल्या कलाकार मित्रांचा पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी झालेला पहिला कार्यक्रम ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचा मेलडी मेकर्स हा वाद्यवृंद, हा प्रवास सराफ यांनी कथन केला. मेलडी मेकर्स या संगीत क्षेत्रात इतिहास घडवणाऱ्या वाद्यवृंदाचा प्रवास पुस्तक स्वरूपात उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा राजेश पांडे यांनी व्यक्त केली. चित्रपट महामंडळाने महाराष्ट्रातील चित्रपट सृष्टीला पुनर्वैभव प्राप्त करून द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

बालगंधर्व रंगमंदिराबरोबर राज्यातील सर्वच कलाकारांचे जिव्हाळ्याचे नाते असल्याचे वर्षा उसगावकर यांनी नमूद केले. पुणेकर रसिक सुखंदळ असल्याचे सर्वज्ञात आहे. त्यांच्या परीक्षेत आपण कायमच उत्तीर्ण झाल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले. ज्या काळात ऑर्केस्ट्रा म्हणजे हिंदी चित्रपट संगीताची भ्रष्ट नक्कल असे समजले जात होते त्या काळात अशोककुमार सराफ यांचा मेलडी मेकर्स आणि प्रमिला दातार यांचा ऑर्केस्ट्रा यांनी ऑर्केस्ट्रा या प्रकाराला प्रतिष्ठा आणि सन्मान मिळवून दिला, असे वर्षा उसगावकर यांनी नमूद केले. बालगंधर्व रंगमंदिर हा कलाकारांबरोबरच केवळ पुण्यातीलच नव्हे तर राज्यभरातील कला रसिकांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. बालगंधर्व रंग मदिराचा पुनर्विकास निश्चितच स्वागतार्ह आहे. कलाकार म्हणून आमच्याकडून त्याला कोणतीही आडकाठी नाही. आम्ही त्याला सहकार्य करू. मात्र, हा पुनर्विकास कलाकारांना विश्वासात घेऊन केला जावा, अशी अपेक्षा मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केली. मुंबईप्रमाणेच पुण्यातही चित्रनगरी व्हावी, या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही देखील त्यांनी दिली. फेब्रुवारी २०२७ महिन्यात चित्रपट महामंडळाच्या वतीने पुण्यात चित्रपट संमेलन आयोजित केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा कुलकर्णी यांनी केले तर अनिल गुंजाळ यांनी आभार मानले.

> **मराठी भाषा, मराठी रंगभूमी आणि मराठी चित्रपट टिकले पाहिजेत हे केवळ भाषणापुरते न राहता आपण त्यासाठी काय करणार आहोत, याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक असल्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी नमूद केले. सध्याच्या काळात चित्रपटगृह बंद होत आहेत. मल्टिप्लेक्स सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर आहे. मराठी चित्रपटांना चित्रपटगृह उपलब्ध होत नाही. या सर्व परिस्थितीबाबत रसिकांपासून राज्यकर्त्यांपर्यंत सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे, असे वाडेकर यांनी व्यक्त केले. बालगंधर्व रंग मंदिराचा पुनर्विकास करताना कलाकार आणि रसिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सूचनेप्रमाणे पुनर्विकास केला जाईल, याची ग्वाही त्यांनी दिली.**

# दुबईतून स्वस्तात सोने खरेदी करुन देण्याच्या आमिषाने महिलेची फसवणूक करणाऱ्यास हडपसर पोलिसांनी केली अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** दुबईतील मॉलमध्ये काम करत असताना इव्हिरेट एअरलाईन्स मध्ये एच आर पदावर कार्यरत असल्याचे सांगून दुबईतून स्वस्तात सोने आणून देतो, असे सांगून महिलेची साडेसहा लाखांची फसवणूक करणार्या तरुणाला हडपसर पोलिसांनी अटक केली आहे.

तेजस तानाजी मोहिते (वय २६, रा. शाहुनगर, साई मंदिरामागे, पिंपरी चिंचवड) असे या अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत हडपसरमधील एका ३१ वर्षाच्या महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा ब्युटी पार्लरचा व्यवसाय आहे. त्यांच्या मैत्रिणीचा तेजस मोहिते हा फेसबुक फ्रेंड आहे. त्याने तो दुबईमध्ये इव्हिरेट एअरलाईन्समध्ये एच आर पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. २ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादी यांनी मैत्रिणीकडे तेजसला दुबईत सोन्याचा दराबाबत चौकशी करायला सांगितली. तेव्हा त्याने १ लाख १ हजार रुपये तोळा भाव असल्याचे सांगितले. त्यावेळी भारतात सोन्याचा भाव हा दीड लाख रुपये होता. त्याने ४ फेब्रुवारी २०२६ रोजी तो भारतात येणार असून त्याला सोबत ३ तोळे सोने घेऊन येता येते, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी त्याला ३ लाख ४ हजार रुपये पाठविले.

त्यानंतर त्याने माझ्याबरोबर आणखी माझे २ मित्र भारतात येणार आहेत, तेही प्रत्येकी ३ तोळे सोने घेऊन येऊ शकतात, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी एकूण ६ लाख ५९ हजार रुपये त्याला पाठविले. त्याने सोने खरेदी केल्याची पावतीही पाठविली. युद्धामुळे विमान कॅन्सल झाल्याचे तो वारंवार सांगु लागला. तेव्हा त्यांना संशय आला. त्यांनी २ फेब्रुवारी २०२६ मध्ये दुबईतील सोन्याचा भाव पाहिला तर तो १ लाख ४३ हजार ३६० रुपये तोळा होता. तेजस याने फसवणुक करण्यासाठी त्यांना १ लाख १ हजार रुपये दर सांगितल्याचे दिसून आले. त्याने पाठविलेली पावतीही खोटी असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा त्यांनी दिलेले पैसे परत मागितले. भारतात आल्यावर तुमचे पैसे देऊन टाकतो, असे तो म्हणाला. २१ मार्च २०२६ रोजी तेजस मोहिते भारतात आला. तरी त्याने फिर्यादी यांचे पैसे परत केले नाही. त्यामुळे त्यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलीस निरीक्षक नीलेश जगदाळे यांनी सांगितले की, तेजस मोहिते हा कोणत्या एअरलाईन्समध्ये नाही तर मॉलमध्ये काम करत होता. पोलिसांनी त्याला अटक केली असुन अधिक तपासासाठी न्यायालयाने शुक्रवार पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# २०० लिटर डिझेल बॅरलमधून विकत देऊन धोकादायकरित्या वाहतूक करणारा पिकअप टेम्पो जप्त करुन पेट्रोल पंप मॅनेजरसह दोघांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आखाती युद्धामुळे पेट्रोल, डिझेलच्या विक्रीवर निर्बंध घातले असताना १२०० लिटर डिझेल बॅरलमधून घेऊन जात असलेला पिकअप टेम्पो जप्त करुन पेट्रोल पंपचालकासह दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रद्धा दत्तात्रय टेकवडे (वय ३४, रा. भेकराईनगर) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी पेट्रोलपंप मॅनेजर रोहन रवींद्र सणस (रा. सदगुरु हौसिंग सोसायटी, चंदननगर) आणि टेम्पोचालक सत्यवान हेमचंद्र सातव (रा. भावडी रोड, वाघोली) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार शिरसवडी येथील वाडे बोल्हाई – राहु रोडवरील भारत पेट्रोलियम कंपनीच्या पेट्रोल पंपावर २२ जून रोजी सायंकाळी सव्वा पाच वाजता घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्याच्या पेट्रोल, डिझेलच्या टंचाईच्या काळात घाऊक औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल/ डिझेल विक्री केंद्रावरुन मोठ्या प्रमाणात डिझेल खरेदी केल्याचा घटना निदर्शनास आल्याने ५ जून रोजी शासनाने पत्रक काढले आहे. अशा प्रकारे गैर प्रकार करणार्यांवर कारवाईचे आदेश देण्यात आले आहे. या आदेशानुसार जिल्हा पुरवठा विभागातील अधिकारी पेट्रोल व डिझेलचा अवैध वापर रोखण्याकरीता स्थानिक पथक फिरत होते. त्यावेळी वाडे बोल्हाई राहु रस्त्यालगत भारत पेट्रोलियम कंपनीच्या पेट्रोल पंपावर एका महिंद्रा पिकअपमध्ये ९ प्लॅस्टिकचे बॅरेलमध्ये डिझेल भरत असल्याचे आढळून आले. तेथे जाऊन खात्री केल्यावर चालक सत्यवान सातव याने कंपनीच्या कामकाजासाठी वाघोली येथे डिझेल घेऊन जात असल्याचे सांगितले. पेट्रोल पंप मॅनेजर रोहन सणस यांना विचारल्यावर त्यांनी आम्ही अशा प्रकारे पेट्रोल व डिझेल देत असतो, असे सांगितले. लोणीकंद पोलिसांना बोलावून पुरवठा अधिकारी यांनी ६ बॅरलमध्ये भरलेले १२०० लिटर डिझेल, ३ मोकळे बॅरल व ५ लाखांचा टेम्पो असा ६ लाख १८ हजार ८०० रुपयांचा माल जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे तपास करीत आहेत.

# मोक्कासह 3 गंभीर गुन्ह्यातील फरार गुन्हेगार जेरबंद; पुणे ग्रामीण एटीएस पथकाची सासवड येथे कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सासवड :** पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) सोमवार दिनांक २२ जुन रोजी सासवड येथून जबरी चोरी, खंडणी, खुनाचा प्रयत्न, आर्म ॲक्ट याप्रमाणे दाखल असलेल्या शिरूर, सासवड, जेजूरी या ३ पोलीस स्टेशनच्या गुन्हयांमध्ये फरार असलेला रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार दिगंबर उर्फ दिग्या दशरथ शेडकर वय २८ वर्षे रा. चांबळी ता.पुरंदर जि.पुणे यास जेरबंद केलेले आहे.

दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी फिर्यादी सुरज अनिल जाधव रा.बेलसर ता. पुरंधर यांनी ट्रान्सफॉर्मर बंद केला नाही म्हणून त्यांना आरोपी दिगंबर शेंडकर व त्याचे ३ साथीदार यांनी लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करुन गंभीर दुखापत केली होती. त्यानंतर तो फरार झालेला होता. त्यानंतर दिनांक ९ मार्च २०२६ रोजी सोनोरी येथील हॉटेल व्यवसायिक राहूल सुभाष काळे रा.सोनोरी ता. पुरंधर यांचे सोनोरी येथील हॉटेलवर आरोपी दिगंबर शेडकर व त्याचे साथीदार यांनी मालक व कामगार यांना दमदाटी शिवीगाळ व लाकडी दांडक्याने मारहाण करून हॉटेलच्या काउंटर मधील ३२ हजार रुपये जबरदस्तीने नेले होते. तसेच सदर हॉटेल व्यवसायिक यास यापूर्वीही धमकावून त्यांच्याकडून अडीच लाख रुपये खंडणी पोटी घेतले होते. दिनांक १९ मार्च २०२६ रोजी मांडवगण फराटा तालुका शिरूर येथे क्रिकेट ग्राउंडवर बॅनर वरील फोटो लावण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात फिर्यादी अमोल आनंदा चौगुले रा.मांडवगण फराटा याचेवर आरोपी दिंगबर शेंडकर व त्याचे ६ साथीदार यांनी जीवे मारण्याचे उद्देशाने पिस्तुलमधून फायरींग करून पळून गेले होते. या घटनां बाबत आरोपी दिगंबर शेंडकर याचेवर जेजूरी पोलीस स्टेशनला गंभीर दुखापत, सासवड पोलीस स्टेशनला जबरी चोरी, खंडणी व शिरुर पोलीस स्टेशनला खुनाचा प्रयत्न, आर्म ॲक्ट याप्रमाणे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. सदर गुन्हयांमध्ये तो फरार असल्याने पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके त्याचे मागावर होती. परंतु तो वेशांतर करुन राहण्याची ठिकाणे बदलून राहत असल्याने पोलीसांना गुंगारा देत होता. दिगंबर उर्फ दिग्या शेंडकर हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापूर्वी राजगड, जेजूरी, सासवड व शिरुर पोलीस स्टेशनला खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, खंडणी, दुखापत, आर्म ॲक्ट व मोक्का या सारखे एकूण १५ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दिगंबर शेंडकर हा अवैध अग्नीशस्त्र विक्री करणारे गुन्हेगार यांचे संपर्कात असल्याची माहिती पुणे ग्रामीण एटीएस पथकास मिळाली होती.




सदर माहितीप्रमाणे पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल यांनी त्याचा शोध घेणेसाठी एटीएस पथकाची नेमणूक केलेली होती. त्याप्रमाणे सदर पथकाने त्याची माहिती काढून त्याचेवर पाळत ठेवून वेशांतर करुन त्यास सासवड ता.पुरंदर जि.पुणे येथून ताब्यात घेतलेले आहे.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेसाठी पिंपरी-चिंचवड सज्ज; २८ जून रोजी ११२३ केंद्रांवर लसीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. शहरातील ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट असून, पालकांनी आपल्या बालकांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेसाठी शहरात एकूण ११२३ लसीकरण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये १००८ स्थायी केंद्रे, ३५ ट्रान्झिट केंद्रे आणि ७७ फिरती केंद्रे कार्यरत राहणार आहेत. बस, रेल्वे आणि मेट्रो स्थानकांसह वीटभट्ट्या, बांधकामे आणि स्थलांतरित वस्त्यांमध्येही लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय तीन नाईट टीमदेखील कार्यरत असतील.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ९५ वैद्यकीय अधिकारी, ३१९ पर्यवेक्षक आणि ४५५२ कर्मचारी यांच्यासह सुमारे ५ हजार जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. दि. २८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत बूथवर लसीकरण होणार असून, दि. २९ जून ते ३ जुलैदरम्यान घरभेटीद्वारे राहिलेल्या बालकांचे लसीकरण केले जाणार आहे.

पोलिओमुक्त भारताचे यश कायम राखण्यासाठी एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे.

# दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाची पहिल्या टप्प्यातील कार्यकारिणी जाहीर; राज्यभर शाखा निर्मिती अभियानाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या संघटन विस्ताराच्या दृष्टीने पक्षाच्या विविध आघाड्या, विभाग व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गाताई भोर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र, पुणे जिल्हा तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील विविध जबाबदाऱ्या पदाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आल्या आहेत. पक्षाचे टप्प्याटप्प्याने विस्तारीकरण करण्यात येणार असून आगामी काळात विविध आघाड्या, विभाग, प्रभाग, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात येणार आहेत.

**पश्चिम महाराष्ट्र व महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी :** श्री शिवाजीराव पाटील प्रवक्ते पश्चिम महाराष्ट्र. जयंश्री साळुंखे – संपर्क प्रमुख, पश्चिम महाराष्ट्र, प्रशांत पठारे – उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, विशाल पठारे – सहसचिव, महाराष्ट्र राज्य, हर्षवर्धन लोखंडे – सचिव, महाराष्ट्र राज्य

**पुणे जिल्हा कार्यकारिणी**

रईसा पठाण – जिल्हा संपर्क प्रमुख, उत्तमराव मांढरे – जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, हेमंत दास – जिल्हाध्यक्ष, वाहतूक आघाडी, अशोक बेलापुरकर – जिल्हा क्रीडा विभाग संघटक, शुभम गायकवाड – जिल्हा युवा आघाडी संपर्क प्रमुख, मोहसीना शेख – जिल्हा सचिव, स्नेहा पठारे – जिल्हाध्यक्षा, शिक्षण आघाडी

**पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणी**

वैभव जगताप – अध्यक्ष, उद्योग आघाडी, रेशमा मुल्ला – महिला अध्यक्षा, उद्योग आघाडी, आकाश बनसोडे – युवा अध्यक्ष, अवंतिका भोर – युवती अध्यक्षा, रमा बनसोडे – शहर उपाध्यक्षा, मेघा कुलकर्णी – भोसरी विभाग उपाध्यक्षा, संतोष डांगी .पिंपळे गुरव प्रभाग अध्यक्षा, इंद्रायणी गायकवाड – उपाध्यक्षा, प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर, कु. दिपाली चव्हाण – पुणे शहर युवती आघाडी उपाध्यक्षा, निरंजन मनवर – उपाध्यक्ष, कामगार आघाडी, खदीर पठाण – उपाध्यक्ष, कामगार आघाडी, रफीक शेख – उपाध्यक्ष, वाहतूक (ट्रान्सपोर्ट) आघाडी, हुरबानू पठाण – पिंपरी चिंचवड अध्यक्षा, अल्पसंख्याक विभाग, रूपाली शिरवळे (निकम) – उपाध्यक्षा, क्रीडा विभाग, अमोल चव्हाण – संपर्क प्रमुख, कामगार आघाडी.




निवेदिता सावंत खेड तालुका संघटक, यावेळी मार्गदर्शक श्री अभय दादा भोर, राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गाताई भोर, उद्योग आघाडी अध्यक्ष वैभव जगताप तसेच शिवाजीराव पाटील यांच्या शुभहस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गाताई भोर यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्याने केवळ पद धारण न करता एक समर्पित कार्यकर्ता म्हणून काम करावे, समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा व पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करावी, असे आवाहन केले.

पुढील काळात उद्योग आघाडी, कामगार आघाडी, वाहतूक आघाडी, आरोग्य विभाग, शैक्षणिक आघाडी, क्रीडा आघाडी, महिला सुरक्षा आघाडी, कला-संस्कृती आघाडी आदी विविध विभागांच्या समित्या स्थापन करण्यात येणार असून समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक परिसरात शाखा निर्मिती अभियान राबविण्यात येणार आहे. समित्यांमध्ये बहुजन समाजाला प्राधान्य देण्यात येणार असून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या नवीन कार्यकर्त्यांना संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

पक्षात अनेक अनुभवी, संघर्षशील व विविध आंदोलने आणि जनचळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतलेले कार्यकर्ते कार्यरत असून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संघटितपणे कार्य केले जाईल. विशेषतः लहान मुली, तरुणी आणि महिलांच्या सुरक्षा, संरक्षण व सक्षमीकरणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## सारांश वृत्त

### भाजपची ऐनवेळी राष्ट्रवादीसोबत युती; शिरूर बाजार समिती निवडणुकीत तुतारीला धक्का

**शिरूर** : शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. अखेर २१४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने १८ जागांसाठी ५२ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी हरिश्चंद्र कांबळे यांनी ही माहिती दिली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवसभर शिरूरमध्ये राजकीय बैठका, चर्चा आणि तडजोडींचे सत्र रंगले होते. अखेरच्या क्षणापर्यंत भाजप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटासोबत युती करणार असल्याची चर्चा होती. मात्र, ऐनवेळी भाजप पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटासोबत हातमिळवणी केल्याने तुतारी गटाला मोठा धक्का बसला असून, तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे. छाननीनंतर ३०० पैकी २६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. अर्ज माघारीच्या दिवशी अनेक उमेदवारांची मनधरणी, राजकीय समन्वय आणि विविध स्तरांवरील चर्चानंतर २१४ जणांनी माघार घेतली. दुपारी ३ वाजता अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतरही काही उमेदवार फॉर्म घेऊन पोहोचले; मात्र वेळ संपल्याने त्यांचे अर्ज कायम राहिले. यामुळे आता बाजार समितीच्या १८ जागांसाठी ५२ उमेदवारांमध्ये थेट लढत होणार आहे.

### टीईटी उमेदवारांनी किमान दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर येणे बंधनकारक

**पुणे** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी (दि. २८) होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२६च्या पार्श्वभूमीवर उमेदवारांसाठी सविस्तर सूचना जारी करण्यात आल्या आहेत. परीक्षा सुरळीत, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावी यासाठी या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

परीक्षार्थींनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान दीड तास अगोदर केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रात प्रवेशासाठी परिषदेच्या संकेतस्थळावरून डाउनलोड केलेले मूळ प्रवेशपत्र आणि आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एक मूळ ओळखपत्र तसेच त्याची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक राहणार आहे.

# सुप्रीम कोर्टाचा NEET-SS संदर्भातील महत्त्वपूर्ण संकेत; इन-सर्व्हिस डॉक्टरांसाठी कट-ऑफ कमी करण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : NEET-SS (Super Specialty) परीक्षेत सरकारी रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या डॉक्टरांसाठी (In-seA°vice candidates) पात्रता कट-ऑफ कमी करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित संस्थांना महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. या प्रकरणामुळे वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत मोठ्या धोरणात्मक बदलांची शक्यता निर्माण झाली आहे.

न्यायालयाने सुनावणीदरम्यान नमूद केले की, सरकारी डॉक्टर हे रुग्णसेवा करत असतानाच अभ्यास करतात, त्यामुळे त्यांच्या कामाच्या जबाबदारीचा विचार करून त्यांच्यासाठी वेगळा आणि तुलनेने कमी कट-ऑफ ठेवण्याचा विचार केला पाहिजे. ग्रामीण व सार्वजनिक आरोग्य सेवेत डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी सुपर-स्पेशालिटी जागा रिक्त राहू नयेत, हा देखील या भूमिकेमागील मुख्य उद्देश असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

न्यायालयाने असेही म्हटले की, सरकारी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांना उच्च शिक्षण (DM/MCh) मिळाल्यास सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला थेट फायदा होतो. त्यामुळे केवळ स्पर्धा परीक्षेतील गुणांवर आधारित निकष न ठेवता सेवा देणाऱ्या डॉक्टरांसाठी स्वतंत्र दृष्टीकोन ठेवण्याची गरज आहे, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

या प्रकरणात २०२५-२६ सत्रातील काही सुपर-स्पेशालिटी जागा रिक्त राहिल्या असून त्या अश्रश्र खपवळर टींर कडे वर्ग करण्याच्या निर्णयावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सरकारी डॉक्टर संघटनांनी असा युक्तिवाद केला आहे की, अशा जागा स्थानिक इन-सर्व्हिस डॉक्टरांना मिळाल्यास सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होईल.



दरम्यान, केंद्र सरकारने याबाबत अद्याप अंतिम भूमिका स्पष्ट केलेली नसून, विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेतील कट-ऑफ बदल आणि धोरणात्मक निर्णय यावर न्यायालयीन देखरेख सुरू असल्याने या प्रकरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, जर इन-सर्व्हिस डॉक्टरांसाठी कट-ऑफ कमी करण्याचा निर्णय लागू झाला, तर ग्रामीण आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये सुपर-स्पेशालिस्ट डॉक्टरांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. मात्र त्याच वेळी प्रवेश प्रक्रियेतील समान संधी आणि गुणवत्तेच्या निकषांवरही चर्चा अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निर्णयाचा अंतिम परिणाम केंद्र सरकारच्या धोरणात्मक अधिसूचनेवर आणि पुढील काउन्सेलिंग मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून असेल, असे स्पष्ट होत आहे.

# विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात झाली आहे. याकरिता सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए)या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. तथापि अद्यापही विधानसभा मतदारसंघामध्ये काही राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक केलेली नाही, तरी एसआयआर प्रकियेची संपूर्ण माहिती होण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची लवकरात लवकर नेमणूक करावी, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित राजकीय पक्षांसोबतच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार शीतल मुळे-भामरे, स्वप्नील खोल्लम यांच्यासह राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी (अजित पवार), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नॅशनल पिपल्स पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्रीमती कळसकर म्हणाल्या, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचनेप्रमाणे एसआयआर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रत्येक बुधवारी राजकीय पक्षांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत २९ जूनपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

राजकीय पक्षांनाही या प्रकियेबाबत सुरुवातीपासूनच विस्तृत माहिती देण्याकरिता लवकरच जिल्ह्यात प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले जाणार आहे. या प्रशिक्षण सत्राच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना एसआयआर प्रकियेबाबत माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी लवकरात लवकर बीएलएची नेमणूक करावी जेणेकरुन बीएलओ आणि बीएलए संयुक्तरित्या बैठक घेवून ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेणार आहे.



एसआयआरच्या अनुषंगाने सुनावणी घेण्याकरिता जिल्ह्यात २१ मतदार नोंदणी अधिकारी आणि ५४४ सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी 'ईसीआय नेट' (एउखछएढ) ॲप्लिकेशन डाऊनलोड करुन घ्यावे. विविध माध्यमांद्वरे एसआयआरबाबत जनजागृती करण्यात येईल, निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्रीमती कळसकर यांनी यावेळी दिली.

यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विधानसभा मतदारसंघ निहाय अनमॅपिग मतदार यादीची मागणी केली असता ती लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल, असे श्रीमती कळसकर यांनी सांगितले.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत शासन सकारात्मक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा द्या!

कोरोना काळातील आर्थिक फटका, वाढते खर्च, परवानग्यांची गुंतागुंत आणि रोजगाराच्या अस्थिरतेचा सामना करणाऱ्या मंडप व्यवसायाला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असल्याने मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा, उद्योगाचा दर्जा आणि विविध कल्याणकारी सुविधांचा लाभ द्यावा, अशी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वरे केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहाच्या अध्यक्षस्थानी विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे होते. यावेळी औचित्याचा मुद्दा सत्रात आमदार लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले.

आमदार लांडगे म्हणाले की, मंडप व्यवसाय हा केवळ विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम किंवा सामाजिक समारंभांपुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, शासकीय कार्यक्रम, निवडणुका, आरोग्य शिबिरे, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध सार्वजनिक सेवांच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असूनही या क्षेत्राला अद्याप अपेक्षित मान्यता आणि सुविधा मिळालेल्या नाहीत.

विधानसभेत मांडलेल्या मागण्यांमध्ये मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्याबरोबरच उद्योगाचा दर्जा प्रदान करणे, परवानगी प्रक्रियेत

# सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय; विमा करारातील तृतीय पक्षाला दावा करता येणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : वाहन खरेदीसाठी कर्ज पुरवणाऱ्या फायनान्सरकडे वाहन सुपूर्द केल्याने त्याला वाहन चोरी किंवा नुकसानीबाबत विमा कंपनीकडून नुकसानभरपाईचा दावा करण्याचा अधिकार मिळत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने हा निकाल देताना राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

प्रकरणानुसार, के. प्रकाशचंद यांनी सोमशेखर यांना वाहन खरेदीसाठी कर्ज दिले होते. आर्थिक अडचणींमुळे सोमशेखर यांनी डिसेंबर २००३ मध्ये संबंधित वाहन फायनान्सरकडे सुपूर्द केले. मात्र, वाहन फायनान्सरच्या ताब्यात असतानाच त्याची चोरी झाली. पोलिसांना वाहनाचा शोध घेण्यात अपयश आल्याने तपास बंद करण्यात आला.

यानंतर फायनान्सरने विमा कंपनीकडे नुकसानभरपाईसाठी दावा दाखल केला. मात्र, विमा कंपनीने तो फेटाळून लावला. वाहनाचा विमा करार हा वाहनमालक आणि विमा कंपनी यांच्यात झाला असून त्यात फायनान्सर पक्षकार नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले. तसेच वाहन फायनान्सरकडे सुपूर्द केल्याचा कोणताही लेखी पुरावा किंवा चोरीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आलेली नसल्याचेही विमा कंपनीने नमूद केले. सुरुवातीला जिल्हा ग्राहक मंचाने फायनान्सरच्या बाजूने निर्णय दिला होता. मात्र, राज्य ग्राहक आयोगाने तो निर्णय रद्द केला. त्यानंतर राष्ट्रीय ग्राहक आयोगानेही राज्य आयोगाचा निर्णय कायम ठेवला. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, विमा करार हा केवळ विमाधारक आणि विमा कंपनी यांच्यातील वैयक्तिक करार असतो. त्यामुळे या कराराच्या आधारे कोणत्याही तृतीय पक्षाला विमा रकमेवर दावा करता येत नाही. खंडपीठाने पुढे स्पष्ट केले की, जरी वाहन मालकाने वाहन फायनान्स कंपनीकडे सुपूर्द केले असे गृहीत धरले, तरी त्यामुळे फायनान्स कंपनीला वाहनाचा कायदेशीर मालक मानता येणार नाही. परिणामी, विमा कंपनीला फायनान्सरला नुकसानभरपाई देण्यास भाग पाडता येणार नाही.

# नीरव मोदीला मोठा दणका; बँक ऑफ इंडियाला १०० कोटी रुपये परत करण्याचे लंडन न्यायालयाचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : भारतीय बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या एका निर्णयात लंडनच्या सर्किट कमर्शियल कोर्टाने फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याला बँक ऑफ इंडियाचे सुमारे १०.७ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे १०० कोटी रुपये) परत करण्याचे आदेश दिले आहेत. कर्जवसुलीशी संबंधित या प्रकरणात न्यायालयाने बँकेच्या बाजूने निकाल देत नीरव मोदीचे सर्व बचावात्मक युक्तिवाद फेटाळून लावले.

हे प्रकरण २०१२ मध्ये फायरस्टार समूहाच्या दुबईस्थित फायरस्टार डायमंड एफझेडई या कंपनीला बँक ऑफ इंडियाने दिलेल्या कर्जाशी संबंधित आहे. या कर्जासाठी नीरव मोदीने वैयक्तिक हमी दिली होती. त्यामुळे कंपनीकडून कर्जफेड न झाल्यास त्याची जबाबदारी थेट नीरव मोदीवर येत होती.

न्यायाधीश सायमन टिंकलर यांनी दिलेल्या निर्णयानुसार, मूळ थकबाकी आणि त्यावरील व्याजासह एकूण १०.७ दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम बँकेला देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. न्यायालयाने वैयक्तिक हमीची वैधता मान्य करत बँकेचा दावा ग्राह्य धरला.

**भारतीय बँकिंग क्षेत्रासाठी सकारात्मक संकेत**

बँकिंग तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय भारतीय बँकांसाठी महत्त्वाचा आहे. परदेशात पळून गेलेल्या आर्थिक गुन्हेगारांविरुद्ध कायदेशीर लढा देताना भारतीय बँकांना आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेकडून मिळणारा पाठिंबा या निकालातून अधोरेखित झाला आहे. कर्जवसुलीच्या प्रक्रियेत वैयक्तिक हमीपत्रांचे महत्त्वही या प्रकरणामुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

गेल्या काही वर्षांत भारतीय बँकांनी थकीत कर्जे वसूल करण्यासाठी दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता (IBC), मालमत्ता जप्ती आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयीन कारवाई यांसारख्या विविध उपायांचा अवलंब केला आहे. नीरव मोदीविरोधातील हा निर्णय त्या प्रयत्नांना बळ देणारा मानला जात आहे.

**पीएनबी घोटाळ्याची पार्श्वभूमी**

नीरव मोदी हा पंजाब नॅशनल बँकेतील (PNB) हजारो कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्यामुळे चर्चेत आला होता. २०१८ मध्ये घोटाळा उघडकीस आल्यानंतर तो भारतातून फरार झाला. मार्च २०१९ पासून तो लंडनमधील तुरुंगात असून भारतात प्रत्यार्पणासाठी न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

# राज्यातील मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा द्या!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : कोरोना काळातील आर्थिक फटका, वाढते खर्च, परवानग्यांची गुंतागुंत आणि रोजगाराच्या अस्थिरतेचा सामना करणाऱ्या मंडप व्यवसायाला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असल्याने मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा, उद्योगाचा दर्जा आणि विविध कल्याणकारी सुविधांचा लाभ द्यावा, अशी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वरे केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहाच्या अध्यक्षस्थानी विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे होते. यावेळी औचित्याचा मुद्दा सत्रात आमदार लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले.

आमदार लांडगे म्हणाले की, मंडप व्यवसाय हा केवळ विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम किंवा सामाजिक समारंभांपुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, शासकीय कार्यक्रम, निवडणुका, आरोग्य शिबिरे, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध सार्वजनिक सेवांच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असूनही या क्षेत्राला अद्याप अपेक्षित मान्यता आणि सुविधा मिळालेल्या नाहीत.

विधानसभेत मांडलेल्या मागण्यांमध्ये मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्याबरोबरच उद्योगाचा दर्जा प्रदान करणे, परवानगी प्रक्रियेत सुलभता आणणे, एकात्मिक परवानगी व्यवस्था लागू करणे, कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे, विमा संरक्षण उपलब्ध करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ या क्षेत्रापर्यंत पोहोचविण्याची मागणी करण्यात आली.

कोरोना काळात मंडप व्यवसायाला मोठा आर्थिक फटका बसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. अनेक व्यावसायिक आणि कामगारांना रोजगार गमवावा लागला होता. आजही वाढते खर्च, विविध परवानग्या, नियमांची गुंतागुंत आणि आर्थिक अडचणींमुळे हा व्यवसाय अनेक संकटांचा सामना करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# मला खोटी आकडेवारी देऊ नका!'... भारताच्या आयात शुल्कावरून डोनाल्ड ट्रम्प आणि हॉवर्ड लुटनिक यांच्यात जोरदार वाद; धक्कादायक खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांच्यात भारतातील आयात शुल्कावरून (टॅरिफ) पडद्यामागे झालेल्या एका अत्यंत तीव्र आणि गुप्त वादाचा खळबळजनक खुलासा झाला आहे. न्यूयॉर्क टाईम्सच्या वरिष्ठ पत्रकारांनी लिहिलेल्या "Regime Change : Inside the Imperial Presidency of Donald Trump' या नव्या पुस्तकात या वादाचा सविस्तर पर्दाफाश करण्यात आला असून, यामुळे जागतिक राजकारणात आणि व्यापारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.सरकारी आकडेवारीला म्हटले 'बुलशिट'पुस्तकातील दाव्यानुसार, व्हाईट हाऊसमध्ये भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंधांवर एक उच्चस्तरीय बैठक सुरू होती. यावेळी वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी अमेरिकन उत्पादनांवर भारत लावत असलेल्या आयात शुल्काबाबत 'ऑफिस ऑफ द युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह' (USTR) ची अधिकृत आकडेवारी ट्रम्प यांच्यासमोर सादर केली. मात्र, ही आकडेवारी पाहताच डोनाल्ड ट्रम्प प्रचंड संतापले. त्यांनी थेट लुटनिक यांच्यावरच आगपाखड केली आणि सरकारी डेटा पूर्णपणे नाकारला. ट्रम्प ओरडले, ''मला कोणीही खरे आकडे देत नाही, हे सगळे 'फकिंग बुलशिट नंबर्स' (पूर्णपणे खोटे आकडे) आहेत.''ट्रम्प यांचा १७५ टक्क्यांचा दावाडोनाल्ड ट्रम्प यांचा असा ठाम समज होता की, भारत अमेरिकन वस्तूंवर अधिकृत आकडेवारीपेक्षा खूप जास्त कर लावतो. अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, भारत अमेरिकेच्या कृषी उत्पादनांवर सरासरी ३७% आणि काही विशिष्ट वाहनांवर १००% पेक्षा जास्त टॅरिफ लावतो. मात्र, ट्रम्प यांच्या मते हा कर प्रत्यक्षात किमान १७५% किंवा त्याहून अधिक होता. ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे अमेरिकेच्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता.'' भारतावर लादला ५०% प्रचंड आयात करया अंतर्गत वादविवादाचे गंभीर परिणाम भारताला भोगावे लागले. आपल्या दाव्यावर ठाम राहत ट्रम्प प्रशासनाने भारताकडून अमेरिकेत येणाऱ्या विविध उत्पादनांवर सुरुवातीला २५% दंडात्मक टॅरिफ लादला. त्यानंतर, भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल खरेदी सुरूच ठेवल्यामुळे ट्रम्प अधिकच संतप्त झाले. भारताने युक्रेन युद्धाच्या काळात रशियाला आर्थिक मदत केल्याचा आरोप करत ट्रम्प यांनी हा कर थेट ५० टक्क्यांपर्यंत वाढवला. यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार युद्ध कमालीचे पेटले होते.नव्या व्यापार करारामुळे अखेर दिलासाया तीव्र आर्थिक संघर्षानंतर, दोन्ही देशांच्या राजनैतिक पातळीवर अत्यंत गोपनीय आणि दीर्घ वाटाघाटी झाल्या. अखेर भारत आणि अमेरिका यांच्यात एक ऐतिहासिक द्विपक्षीय व्यापार करार यशस्वीरित्या संपन्न झाला आहे. या नव्या करारानुसार, भारताने रशियन तेलाची खरेदी टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे मान्य केले आहे. या बदल्यात अमेरिकेने भारतावरील ५० टक्क्यांचा जाचक आणि दंडात्मक आयात कर पूर्णपणे मागे घेतला असून, तो आता १८% च्या बेसलाइनवर आणला आहे. या नव्या करारामुळे भारतीय निर्यातदारांना आणि दोन्ही देशांतील व्यापारी संबंधांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

